REGISTERED No. B 3434

**जाहिरातींचे दर.**
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४.


# अर्थ

**वर्गणीचे दर.**
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ४ पुणें, बुधवार, तारीख १२ आक्टोबर, १९३८ अंक ४१



# किर्लोस्कर

**२५ फुटांहून खोल विहिरींसाठी किर्लोस्कर हुगळी पंपाची कामगिरी लोकांना फारच पसंत पडली आहे.**

कारखान्याचे प्रतिनिधी आपल्यास भेटतील, त्यांना आपली गरज कळवा. म्हणजे आपल्या उपयोगी पडेल अशा किर्लोस्कर पंपाची निवड ते करून देतील किंवा थेट कारखान्यास लिहा. म्हणजे सविस्तर माहिती दिली जाईल.

## हुगळी पंप

किर्लोस्कर हात व पावर पंपांचा सचित्र कॅटलॉग मागवा।

**किर्लोस्कर बंधु लि. : : किर्लोस्करवाडी, सातारा**

**सर्वांगीण प्रगति**
सन १९३७ भक्कम भरभराटीचें वर्ष

# वेस्टर्न इंडिया

**लाईफ इन्शुअरन्स कंपनी लिमिटेड**
सातारा शहर

१९३८ अखेर
*आठवें मूल्यमापन*
आणि
**रौप्य महोत्सव**

**त्रैवार्षिक बोनस**
हयातीनंतर रु. ७५ आणि हयातींतील रु. ६०
*कोणत्याही दृष्टीनें पहा*
वेस्टर्न इंडिया ठसठशीतपणें डोळ्यांत भरेल.
**पुणें शाखा : : लक्ष्मी रोड, पुणें.**

# विविध माहिती

### तुर्कस्तानांतील औद्योगिक कार्यक्रम

तुर्कस्तान देशानें चार वर्षांचा औद्योगिक कार्यक्रम आखला आहे, त्यास सुमारें १७ कोटि रुपये खर्च येईल. त्या देशांतील खाणींचें उत्पादन वाढविणें, काळ्या समुद्राचे किनाऱ्यावर दोन बंदरें बांधणें, कृत्रिम पेट्रोलचें आणि सिमेंटचें उत्पादन करणें इत्यादि कार्याकडे वरील रकमेचा विनियोग केला जाईल.

### गव्हाचें उत्पादन

चालू वर्षी जगांतील सर्व देशांमध्यें गव्हाचें पीक फारच चांगलें येणार, असा रंग दिसतो. गेल्या वर्षीपेक्षा यंदाचें जागतिक उत्पादन सुमारें १२ टक्क्यांनीं अधिक होईल. गेल्या वर्षींचेंच उत्पादन मागणीपेक्षा अधिक भरलें; तेव्हां चालू सालीं गव्हाचे बाजारभाव मंदीचेच रहाणार हें स्पष्ट आहे. अर्थात्, एकादें मोठें युद्ध उद्‌भवलें, तर गव्हास तेजी येईल.

### काटकसर

जपानचें चीनशीं चालू असलेलें युद्ध संपेपर्यंत, जपानी अधिकारी वर्गानें नेकटाय वापरण्याचें सोडून दिलें आहे. चहा-कॉफीपानावरहि त्यांनीं नियंत्रण घातलें आहे. गेल्या महायुद्धाचे काळांत ग्रेट ब्रिटनमध्यें अशाच प्रकारच्या काटकसरीच्या योजना अमलांत होत्या आणि कागदाच्या टंचाईमुळें चेकची लांबी-रुंदी कमी करण्यांत आली होती. लहान चेकबुक ज्यास्त सोईचें वाटल्यामुळें, युद्ध संपल्यावरहि त्याचा आकार वाढविण्यांत आलेला नाहीं.

### एका शिल्पकाराची शक्कल

राष्ट्रीय पुढाऱ्यांच्या कार्याविषयीं कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी त्यांचे पुतळे उभारण्यांत येतात. परंतु, त्यास खर्च अतिशय येतो तो वाचविण्याची युक्ति एका शिल्पकारानें सुचविली आहे. एक मोठा ब्रॉंझचा पुतळा ओतण्यांत यावा आणि त्यावरील डोकें काढतां-घालतां येण्याजोगें असावें, म्हणजे जरूरीप्रमाणें नवीन डोकें बसविलें कीं, नवीन पुतळा तयार होईल, अशी त्याची शक्कल आहे. एकाच धडावर अनेक डोकीं आलटून पालटून बसविलीं म्हणजे नवीन पुतळ्यांचा खर्च वाचेल, अशी त्याची योजना आहे.

### दौंड–बारामती आणि पाचोरा–जामनेर कंपन्यांचा डिव्हिडंड

दौंड-बारामती रेल्वे कंपनीस ३१ मार्च, १९३८ अखेर संपलेल्या वर्षी ६९,३२५ रुपये उत्पन्न मिळालें, त्यांतून ४९,५०९ रुपये निवळ नफा उरला. भागीदारांस ३¾ % दरानें डिव्हिडंड मिळालें. पाचोरा-जामनेर रेल्वे कंपनीस गेल्या वर्ष अखेर४७,०९९ रुपये निवळ नफा झाला आणि तिच्या भागिदारांस ३¾ % दरानें डिव्हिडंड मिळालें. दोन्ही कंपन्यांच्या वार्षिक सभा श्री. पुरुषोत्तम का. गोडबोले ह्यांचे अध्यक्षतेखालीं भरल्या होत्या.

### सिगारेटच्या थोटकांपासून कारखानदाराचा फायदा

साधारणपणें सिगारेटची लांबी २¾ इंच इतकी असते. परंतु सबंद सिगारेट ओढतां येत नाहीं; ओठ भाजूं नयेत ह्यासाठी सुमारें पाऊण इंच लांब थोटूक टाकून द्यावें लागतें. म्हणजे, दहा सिगारेट्सच्या पाकिटांतील दोन-अडीच सिगारेट्स वाया जातात, असा हिशेब होतो. अर्थात्, न ओढलेल्या ह्या थोटकांमुळें सिगारेट्सच्या कारखानदारांचा फायदा होतो.

### जर्मन सरकारचें नवीन कर्ज

जर्मन सरकारनें ११० कोटि रुपयांचें नवीन कर्ज उभारण्याचें जाहीर केलें आहे. व्याजाचा दर ४½% आहे. निम्यापेक्षा अधिक रोख्यांस तात्काळ मागणी आली.

### वानरांची निर्गत

अमेरिकेमध्यें दरसाल सुमारें २० हजार वानरांची आयात होते. क्षय, हिंवताप, अर्धांगवायु इत्यादि रोगांसंबंधीं संशोधन करण्यासाठी ह्या वानरांवर प्रयोग करण्यांत येतात. गेल्या आठवड्यांत कलकत्त्याहून ५०० वानरें अमेरिकेकडे रवाना झालीं. कोलंबिया विश्वविद्यालयाचे डॉ. कार्पेंटर ह्यांचे देखरेखीखालीं ही सेना प्रवास करीत आहे.

### इंपीरिअल बँकेकडून कर्ज

अखिल भारतीय खादी संघानें इंपीरिअल बँकेकडून तीन लक्ष रुपयांचें कर्ज घेण्याचें ठरविलें आहे.

### क्षयरोग चिकित्सालयें

ग्रेट ब्रिटनचें क्षेत्रफळ ५३,८५१ चौरस मैल असून त्याची लोकसंख्या ४½ कोटि आहे. हिंदुस्थानचें क्षेत्रफळ १७,०७,६७९ चौरस मैल आणि लोकसंख्या ४० कोटि आहे. ग्रेट ब्रिटनमध्यें सुसज्ज अशीं ६७७ क्षयरोग चिकित्सालयें आहेत; हिंदुस्थानांत फक्त ४० ठिकाणीं अशी सोय आहे. हिंदुस्थानांतील क्षयरोग्यांच्या संख्येच्या मानानें क्षयरोगाच्या उपचाराची व्यवस्था अत्यंत अपुरी आहे.

### जम्मू ॲण्ड काश्मीर बँक लि०

काश्मीर संस्थानामध्यें वरील नांवाची बँक स्थापन झाली आहे. बँकेचें नियोजित भांडवल ५० लक्ष रुपये असून २० लक्ष रुपयांचें भांडवल विक्रीस काढलेलें आहे. ह्यापैकी निम्में भांडवल काश्मीर सरकार घेणार आहे आणि उरलेल्या निम्म्या भांडवलाचे भागांच्या विक्रींत काश्मीरच्या प्रजाजनांचे मागणीस प्राधान्य मिळणार आहे.

### ट्रेझरी बिलांवर १ रु. ६ आ. ५ पै व्याजाचा दर

रिझर्व्ह बँकेनें गेल्या आठवड्यांत दोन कोटि रुपयांचीं हिंदुस्थान सरकारचीं ट्रेझरी बिलें विकलीं, त्यांवर व्याजाचा दर द. सा. द. शे. १ रु. ६ आ. ५ पै इतका पडला.

### ऑस्ट्रेलियाचा लोकरीचा व्यापार

ऑस्ट्रेलिया देशास सन १९३७-३८ मध्यें लोकरीपासून एकूण सुमारें ५७ कोटि रुपये मिळाले. ऑस्ट्रेलियांतून निर्गत झालेल्या लोकरीपैकी शेकडा ८२ इतकी लोकर ग्रेटब्रिटन, फ्रान्स बेल्जम, इटली आणि जर्मनी ह्या देशांत खपली.

### फेडरेशन केव्हां येणार !

हिंदी फेडरेशनच्या स्थापनेची मामुली घोषणा ता. १ जानेवारी, १९४० रोजीं होऊं शकेल, अशी बातमी आहे.

### कोल्हापूर येथें नवीन बँकेची स्थापना

कोल्हापूर येथें इंडस्ट्रिअल बँक नांवाची एक बँक कोल्हापुरांतील उद्योगधंद्यास सहाय करण्याचें उद्देशानें स्थापन करण्यांत आली आहे.

### मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत

| | किंमत रुपये |
|---|---|
| २५-९-३८ ते १-१०-३८ | १३,३०,०५४ |
| २-१०-३८ ते ८-१०-३८ | ५६,५२.३३७ |
| २१-९-३१ ते ८-१०-३८ | ३,२०,२१,६९,८७३ |

## अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | ४९४ |
| २ उद्योगधंद्यांच्या वाढीकरितां संघटित प्रयत्न | ४९५ |
| ३ मोटारींच्या उत्पादनाचा नियोजित कारखाना | ४९६ |
| ४ स्फुट विचार ... | ४९७ |
| विकत श्राद्ध कोण घेतो!—पुढें काय होणार!—एका नवीन धंद्याची स्थापना—"न्यायबोध"—गेल्या आठवड्यांतील रोखे बाजार—मुंबई शहरांत दारूबंदीचे प्रयत्न | |
| ५ सहकारी चळवळ | ४९९ |
| ६ मुंबई प्रांतांतील रस्ते | ४९९ |
| ७ उद्योग मंत्र्यांची परिषद् | ५०० |
| ८ निवडक बाजारभाव | ५०१ |
| ९ कायदे मंडळांत आर्थिक प्रश्नांवर प्रकाश ... | ५०१ |
| १० झेकोस्लोव्हेकिया | ५०१ |



# अर्थ

बुधवार, ता. १२ आक्टोबर, १९३८


## उद्योगधंद्यांच्या वाढीकरितां संघटित प्रयत्न

### दिल्ली येथील मंत्र्यांच्या परिषदेनें आरंभलेलें कार्य

हिंदुस्थानांतील ज्या प्रांतांमध्यें राष्ट्रीय सभेचीं प्रधान मंडळें आहेत, अशा प्रांतांतील औद्योगिक खात्याच्या मंत्र्यांची परिषद् श्री. सुभाषचंद्र बोस ह्यांचे अध्यक्षतेखाली नुकतीच पार पडली. हिंदी उद्योगधंद्यांच्या वाढीसंबंधीं विचार करण्याकरितां सात प्रांतांतले उद्योगमंत्री सहविचारानें एकत्र जमले आणि त्यांनीं एक व्यावहारिक योजना आखून योजनात्मक आर्थिक प्रगतीचा पुरस्कार केला, ही गोष्ट हिंदी उद्योगधंद्यांचे दृष्टीनें अत्यंत महत्त्वाची अशी झाली. लोकमतानुवर्ती प्रांतिक सरकारांनीं अशा प्रकारें संघटित प्रयत्न चालू ठेवल्यास, हिंदी औद्योगिक प्रगतीस जोरानें चालना मिळेल, हें उघड आहे. परिषदेनें मंजूर केलेल्या ठरावांचा गोषवारा ह्याच अंकांत इतरत्र देण्यांत आलेला आहे, त्यावरून परिषदेनें आपलें कार्य किती उत्कृष्ट रीतीनें पार पाडलें आहे, हें समजून येतें. उद्योगधंद्यांची वाढ झाल्याविना हिंदुस्थानाची आर्थिक उन्नति होणार नाहीं; उद्योगधंद्यांची स्थापना करून त्यांची जोपासना करण्याचें काम खासगी प्रयत्नांवर न सोपवितां व्यापक, राष्ट्रीय स्वरुपाच्या योजनात्मक आर्थिक धोरणानुसार तें हातीं घेण्यांत यावें, असें आपलें मत परिषदेनें व्यक्त केलें. केवळ शेतीसुधारणेनें भागणार नाहीं; हिंदुस्थानांत मोठ्या प्रमाणावर, राष्ट्रीय महत्त्वाच्या उद्योगधंद्यांची स्थापना शक्य तितक्या लवकर होणें अगत्याचें आहे, असें श्री. सुभाषचंद्र बोस ह्यांनीं आपल्या भाषणांत सांगितलें आणि परिषदेनें त्याच भूमिकेवर आपली योजना आखली. कॉंग्रेसचें धोरण खेडेगांवीं उद्योगधंद्यांस जितकें अनुकूल आहे, तितकें तें शहरांतील मोठ्या प्रमाणावरील उत्पादनास नाहीं, अशी समजूत सर्वत्र प्रचलित आहे. तथापि श्री. बोस ह्यांनीं केलेल्या, मोठ्या प्रमाणावरील उद्योगधंद्यांच्या प्रशस्तीवरून आणि त्यांनीं त्याबाबत केलेल्या महत्त्वाच्या सूचनांवरून ही समजूत खोटी ठरेल आणि परिषदेच्या ठरावानुसार प्रत्यक्ष कार्यास प्रारंभ झाला म्हणजे औद्योगिक उन्नतीसंबंधीं कॉंग्रेस प्रांतिक सरकारांची भूमिका स्पष्टपणें लोकांच्या नजरेस येईल.

सर्व तऱ्हेचीं यंत्रें आणि त्यांचे सुटे भाग, हरतऱ्हेचीं हत्यारें, मोटारगाड्या, वहातुकीशीं संबंध येणारे आणि विद्युत्पादनास अनुषंगिक असे उद्योगधंदे, रसायनें, कृत्रिम खतें, इत्यादि जिनसाचें हिंदुस्थानांत मोठ्या प्रमाणावर उत्पादन सुरू होणें अत्यावश्यक असल्यानें त्यासंबधांत योग्य ते प्रयत्न तात्काळ सुरू करण्यांत यावेत, असें परिषदेनें ठरविलें. हें कार्य हातीं घेण्यासाठी एक योजना समितीहि नेमण्यांत आली आणि तिचें काम तातडीनें व्हावें म्हणून तिनें चार महिन्यांत आपला रिपोर्ट तयार करावा, अशी कालमर्यादाहि घालून देण्यांत आली. अखिल भारतीय स्वरूपाचे एक नॅशनल प्लॅनिंग कमिशन नेमण्यांत यावें असें ठरवून, त्याचे सभासद निवडण्याचें काम परिषदेनें कॉंग्रेसच्या अध्यक्षांकडे सोपविलें. ह्या कमिशननें सादर करावयाच्या रिपोर्टास कालाचें नियंत्रण कमिशननें स्वतःच घालावयाचें आहे. समितीच्या आणि कमिशनच्या कार्याचा उठाव त्वरित व्हावा, एवढ्यासाठीच वेळाचीही मर्यादा ठरविण्यांत यावयाची आहे. नॅशनल प्लॅनिंग कमिशनचें कार्यक्षेत्र किती व्यापक आहे आणि त्याचें काम किती जबाबदारीचें आहे, हें त्याजकडे सोपविलेल्या महत्त्वाचे कामगिरीवरून स्पष्ट होईल. उद्योगधंद्यांची वाढ होण्यासंबंधीं हिंदुस्थानांत कोणाचाच मतभेद असणें संभवनीय नाहीं. प्रत्येक प्रांत आणि प्रत्येक संस्थान ह्यास औद्योगिक प्रगति हवी आहे, तथापि ह्याबाबत प्रत्येकानें स्वतंत्र प्रयत्न करण्यापेक्षां सर्वांनीं मिळून एकत्र येऊन प्रयत्न करणें ज्यास्त परिणामी ठरेल हें उघड आहे. अशा तऱ्हेचें सहकार्य घडवून आणण्याचा परिषदेचा प्रयत्न अत्यंत स्तुत्य आहे यांत संशय नाहीं. प्रत्येक प्रांत आणि प्रत्येक संस्थान अखिल भारतीय योजनेंत सामील झाल्यास मोठ्या प्रमाणावर योजना आखतां येतील, तज्ज्ञांचा सल्ला घेतां येईल, संशोधन करवितां येईल आणि औद्योगिक प्रगतींत सर्वांसच सहभागी होतां येईल.

हिंदी उद्योगधंद्यांच्या प्रगतीचे मार्गांतील कांहीं अडचणींचें निराकरण करणें सर्वस्वी मध्यवर्ती सरकारच्या हातांत आहे. प्रांतिक सरकारांनीं संघटन करून मध्यवर्ती सरकारावर आपल्या एकमुखी मागणीचें वजन पाडल्यास, हिंदुस्थान सरकारास ही मागणी नाकारणें सोपें जाणार नाहीं. प्रांतांची जूट इतर प्रकारांनींहि राष्ट्रास सहायकारक होईल. वास्तविक, आर्थिक संघटनेचें आणि योजनात्मक धोरण आखण्याचें काम हिंदुस्थान सरकारनेंच हातीं घ्यावयास पाहिजे होतें. हें कार्य करण्यास राष्ट्रीय सभेच्या अध्यक्षांचे नेतृत्वाखालीं प्रांतिक कॉंग्रेस सरकारांनीं पुढें यावें, हें मध्यवर्ती सरकारास भूषणावह नाहीं. प्रांतिक सरकारांनीं ह्याबाबत घेतलेल्या पुढाकारास राष्ट्रांतील औद्योगिक तज्ज्ञांचा आणि पुढाऱ्यांचा पाठिंबा आहे ही आनंदाची गोष्ट आहे. वाया जाणाऱ्या मोलॅसेसपासून कृत्रिम पेट्रोलच्या (पॉवर आल्कोहोल) आणि मोटारगाड्यांच्या उत्पादनासंबंधीं योजना तयार होत आहेत, त्यांचें प्रत्यक्ष कारखान्यांत लवकरच रूपांतर होईल, अशी सबळ अशा आहे. प्रांतिक सरकारें आणि संस्थानें ह्यांनीं संघशक्तीनें देशी उद्योगधंद्यांस प्रत्यक्ष हातभार लावण्याचें ठरविलें, म्हणजे त्या धंद्यांचे वाढीस अनुकूल वातावरण निर्माण होऊन

त्यांस भांडवलाचाहि पुरवठा अपुरा पडणार नाहीं. ट्रेनिंग कमिटी आणि नॅशनल ट्रेनिंग कमिशन ह्यांचें कार्य नव्या उत्साहानें पार पडेल आणि त्यांच्या परिश्रमाचें फळ अल्प काळांतच आपल्यास दिसूं लागेल, अशी आशा आहे. ज्या प्रांतांत कॉंग्रेसचीं प्रधान मंडळें नाहींत अशा प्रांतांनीं सरकारें आणि हिंदी संस्थानें हींहि वरील योजनेंत सामील होतील,अशी अपेक्षा आहे. मद्रास प्रांताचे उत्साही उद्योगमंत्री, श्री. गिरी, ह्यांचेवर ह्या संबंधांतील प्राथमिक कार्याची जबाबदारी टाकण्यांत आलेली आहे, त्यामुळें, परिषदेनें नेमलेल्या कमिटीचें आणि कमिशनचें काम व्यवस्थितपणें सुरू होईल ह्याविषयीं शंका वाटत नाहीं.

## मोटारींच्या उत्पादनाचा नियोजित कारखाना

### सर एम् विश्वेश्वर अय्या ह्यांची योजना

दिल्ली येथें भरलेल्या, प्रांतिक उद्योग मंत्र्यांच्या परिषदेस सर विश्वेश्वर अय्या ह्यांनीं मोटारींच्या कारखान्याचे स्थापनेबाबत आपली योजना सादर केली. त्यांतील महत्त्वाचे उतारे येथें दिले आहेत:—

### मोटारींच्या उत्पादनास हिंदुस्थानांत वाव

१९३७ सालीं हिंदुस्थानांत एकूण २९,०८२ मोटार वहानांची आयात झाली, त्यांपैकी १६,०३६ मोटार गाड्या होत्या आणि १३,०४६ लॉऱ्या होत्या. ह्या गाड्यांची आणि त्यांस लागणाऱ्या सुट्या भागांची मिळून किंमत आठ कोटि रुपये तरी होईल. म्हणजे, दरसाल इतकी रकम मोटारींचे पायीं परदेशीं जाते. मोटार हें सुधारणेचें चिन्ह आहे असें मानल्यास, अमेरिकेचा अनुक्रम ह्या बाबतींत पहिला लागतो. सबंद जगांत मिळून वापरांत असलेल्या ४½ कोटि मोटारींपैकीं एकट्या अमेरिकेंत ३ कोटि मोटारी चालू आहेत ! त्या देशांतील कुटुंबांपैकी शेकडा ५४ कुटुंबांचे मालकींत प्रत्येकीं निदान एक गाडी तरी आहे. जगांतील एकूण मोटारींपैकी शेकडा फक्त ०·४ इतक्या मोटारी हिंदुस्थानामध्यें वापरांत आहेत. १९३६ सालीं ह्या देशांत ९१ हजार मोटार गाड्या, २२ हजार बसेस्, ६ हजार टॅक्सी आणि २० हजार लाऱ्या चालू होत्या आणि त्यांचे प्रीत्यर्थ ४४ कोटि रुपये खर्च झाले.

### पूर्व तयारी

हिंदुस्थानामध्यें मोटारींच्या उत्पादनाचा कारखाना स्थापन करावयाचा, त्याची जागा जेथें कच्चा माल आणि तज्ञ कामगार सहज उपलब्ध होतील अशा ठिकाणीं निवडण्यांत यावी. तयार होणाऱ्या मोटारींच्या उठावासहि ती जागा सोईची असावी. ह्या दृष्टीनें मुंबई शहर हें सुचविण्यांत येत आहे. नियोजित कारखान्यांतून दरसाल १० हजार मोटारी आणि ५ हजार लॉऱ्या तयार होऊं शकतील, अशी व्यवस्था असावी. कांहीं सुटे भाग तूर्त परदेशांतून मागवणें स्वस्त आणि सोइस्कर पडेल. सुरवातीस फोर्ड व्ही एट्च्या सारखी मध्यम शक्तीची मोटार आणि १½ टनांची लॉरी ह्यांचें उत्पादन हातीं घ्यावें. कारखाना उभारण्यास दोन वर्षें पुरतील. हें काम एखाद्या विदेशी चांगल्या अब्रूदार कारखानदाराकडे सोपवावें, म्हणजे हिंदी कंपनीच्या हितास धोका येणार नाहीं. रशियास फोर्ड कंपनीनें अशा तऱ्हेचें सहाय केलें होतें आणि त्या देशांत आतां दरसाल दोन लक्ष गाड्या तयार होऊं लागल्या आहेत. कारखान्याच्या व्यवस्थेचें कामहि प्रारंभीं विदेशी तज्ञांकडेच देणें इष्ट होईल.

### कारखान्याची उभारणी आणि पैशाची व्यवस्था

प्रत्येक मोटार ही सुमारें दोन हजार लहान सुट्या भागांची केलेली असते आणि हा प्रत्येक भाग स्वतंत्र यंत्रांचे सहायानें बनविलेला असतो. हीं यंत्रें ठराविक साच्याचीं असतात आणि तीं चालविण्यास विशेष हुशारी लागत नाहीं. हिंदी कामगार हीं कामें सहज करूं शकतील. कारखाना उभारून तें चालविण्याचें काम हातीं घेण्यासाठी एक संयुक्त भांडवलाची मंडळी स्थापन करावी लागेल. कारखान्याच्या इमारतीसाठी आणि यंत्रसामुग्रीसाठी ९० लक्ष रुपये आणि खेळत्या भांडवलासाठी ६० लक्ष रुपये, मिळून एकूण १½ कोटि रुपयांची तरतूद केली पाहिजे, त्यासाठी भागांची पुढील योजना आखली आहे:—

| | लक्ष रुपये |
|---|---|
| प्रत्येकी १० रुपयांचे १० लक्ष ऑर्डिनरी भाग | १,०० |
| प्रत्येकी १०० रुपयांचे ३ लक्ष क्यु. प्रे. भाग | ३० |
| प्रत्येकी १००० रुपयांचे २ हजार फौंडर्स भाग | २० |
| | १,५० |

### उत्पादन खर्चाचा हिशेब आणि अपेक्षित नफा

सध्याच्या मोटारींचें धंद्याबाबत आकडे पाहिले, तर असें आढळून येतें कीं मध्यम शक्तीच्या मोटारीचे उत्पादनास अमेरिकेंत सुमारें १,२६० रुपये खर्च येतो. मुंबईपर्यंतचें वहातुकीचें भाडें, ३७½% दरानें आयात पट्टी, इत्यादींस सुमारें १,१३० रुपये लागतात आणि ही मोटार मुंबई शहरांत ३,२०० रुपयांस विकली जाते. म्हणजे, हिंदी विक्रेत्यास ८१० रुपये रहातात आणि खरेदी करणाऱ्या गिऱ्हाइकास मोटारीच्या मूळ किंमतीचे अडीच पट किंमत द्यावी लागते. मोटारींच्या हिंदी कारखान्यांत तूर्त कांहीं सुटे भाग तयार केले नाहींत आणि तेथील खर्चाचें प्रमाणहि थोडें अधिक राहिलें तरी प्रत्येक गाडीमागें ५८० रुपये कारखान्यास उरतील अशी अपेक्षा आहे. इतर कांहीं खर्चाकरितां प्रत्येक गाडीमागें २५० रुपये सोडले, तरी १½ कोट रुपये भांडवलावर ३० लक्ष रुपये, म्हणजे शेकडा २० इतका नफा सुटेल.

### मध्यवर्ती आणि प्रांतिक सरकारांची मदत

हिंदुस्थान सरकारनें, आयात होणाऱ्या मोटारींवर जकात शेकडा ३७½ इतकी आहे ती वाढवून शेकडा ५० इतकी केली, तर मोटार कारखान्यास अत्यंत लवकर उर्जितावस्था प्राप्त होईल. कारखान्यानें परदेशांतून मागविलेल्या सुट्या भागांवर सरकारनें जकातीची माफी दिली आणि हिंदी रेलवेजनीं वहातुकीच्या दरांत सवलत दिली, तर कारखान्यास बहुमोल सहाय होईल. प्रांतिक सरकारें आणि संस्थानें ह्यांस नियोजित कंपनीचे भाग, डिबेंचर्स इत्यादि घेण्यास हरकत नाहीं आणि दरसाल कांहीं किमान मोटारींच्या खरेदीची हमीहि त्यांस घेतां येईल.

पुण्यांत येणाऱ्या प्रवाशांसाठी भोजनाचें व उतरण्याचें निर्धास्त ठिकाण.
पूना
गेस्ट हाउस
टेलिफोन नं. ७७९ : लक्ष्मी रोड—गणपति चौक—पुणें
हवेशीर जागा
सुग्रास भोज
उत्तम आदरातिथ्य

# स्फुट विचार

### विकत श्राद्ध कोण घेतो ?

ब्रिटिश आणि फ्रेंच कायदेमंडळांनीं आपल्या मुख्य प्रधानांस, त्यांनीं झेकोस्लोव्हेकियाच्या संबंधांत अंगिकारलेल्या धोरणाबाबत पाठिंबा दिला आहे. " इंग्लंड आणि फ्रान्स ह्या राष्ट्रांनीं जर्मनीचा प्रतिकार करण्यास झेकोस्लोव्हेकियास सहाय देण्याचें ठरवलें असतें तर युरोपभर युद्धाच्या ज्वाला भडकून भयंकर मनुष्यहानी झाली असती आणि कांहीं झालें तरी झेकोस्लोव्हेकिया वांचणें शक्य नव्हतें. जर्मनीच्या मागण्या त्यांनीं मुकाट्यानें मान्य केल्यामुळें झेकोस्लोव्हेकियन मुत्सद्यांस आपला मुख्य आणि मध्यवर्ती प्रदेश वांचवतां आला आहे आणि त्याच्या स्वातंत्र्याची हमी इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी व इटली ह्या राष्ट्रांनीं घेतली आहे हा मोठाच लाभ आहे." मि. चेंबर्लेन आणि त्यांचे अनुयायी ह्यांचें ब्रिटिश धोरणाचें समर्थन वरील आशयाचें आहे. जगांत आपणांस कोणी मित्र उरलेला नाहीं हें लक्षांत घेऊन झेकोस्लोव्हेकियन मुत्सद्यांनीं जें दूरदर्शीपणाचें धोरण धैर्यानें स्वीकारलें आहे, त्याबद्दल त्यांचें कौतुक केलें पाहिजे. त्या राष्ट्राचे प्रेसिडेंट, डॉ. बेनेस, ह्यांनीं आपल्या जागेचा राजीनामा दिला आहे आणि असें करतांना त्यांनीं काढलेले उद्गार त्यांच्या धीरोदात्त धोरणाची साक्ष पटवतात. आपल्या राष्ट्रास दिलेल्या संदेशांत ते म्हणतातः— " सामोपचारानें तंटा मिटवण्याची आम्हीं शिकस्त केली. पण आमच्या घरगुती भांडणास आंतरराष्ट्रीय झगड्याचें स्वरूप प्राप्त झालें. आम्हांस न विचारतांच चार प्रमुख राष्ट्रांनीं आमच्या राजकारणाचा निर्णय केला. ह्यावर टीका करण्याची माझी इच्छा नाहीं. इतिहास सत्याची ग्वाही देईल. " ब्रिटिश प्रधानमंडळास हाउस ऑफ कॉमन्समध्यें स्वतःच्या धोरणाचें समर्थन करतांना नाकीं नव आलें असें स्पष्ट दिसतें. ग्रेट ब्रिटनची लढाऊ सामुग्रीची तयारी पुरी नव्हती आणि ती असती तरी जर्मनीच्या विरुद्ध झेकोस्लोव्हेकियन लढ्यांत पडणें त्यास शक्य नव्हतें ही गोष्टहि कॉमन्स सभेंतील वादविवादावरून सिद्ध झाली आहे. झेकोस्लोव्हेकियाचें विकत श्राद्ध घेऊन तर्पण करण्याची ब्रिटिश मुत्सद्यांची इच्छा नव्हती हेंच खरें.

### पुढें काय होणार ?

"कठिण समय येता कोण कामासि येतो ?" अशी अवस्था झेकोस्लोव्हेकियाची झाली आणि आलेल्या प्रसंगास निमूटपणें त्यास तोंड द्यावें लागलें आहे. इकडे एखाद्या विजयी योद्ध्याप्रमाणें हिटलरनें झेकोस्लोव्हेकियाच्या सुडेटेन प्रदेशांत प्रवेश केला आहे. युद्ध टाळून आंतरराष्ट्रीय तंटे सामोपचारानें मिटवण्याचा पायंडा घातल्याचें श्रेय मि. चेंबर्लेन स्वतःस घेत आहेत. हिटलर ह्यापुढें दांडगेपणा करणार नाहीं ह्याची शाश्वती काय ? ह्या प्रश्नाचें समाधानकारक उत्तर त्यांचेपाशीं नाहीं. आंतरराष्ट्रीय संबंधांत शांततेचें साम्राज्य स्थापन झालें आहे असें मि. चेंबरलेन म्हणतात; मग शस्त्रास्त्राची तयारी कां चालू ठेवण्यांत येणार आहे ह्याचेंहि स्पष्टीकरण त्यांस करतां येत नाहीं. हिटलरपुढें इंग्लंडनें आपल्या कमकुवतपणाचें प्रदर्शन केलें ह्यामुळें त्याचा बोज राहिला नाहीं अशी टीका मि. चर्चिल सारख्यांनीं कॉमन्स सभेंत केली. सुडेटन विभाग एकदम गिळण्याचा हिटलरचा विचार होता; ते विभाग एकामागून एक त्याच्या तोंडांत इंग्लंड व फ्रान्स ह्यांनीं वाढले असें त्यांनीं ब्रिटिश धोरणाचें वर्णन केलें. झेकोस्लोव्हेकियांतील विजयानें हिटलर आणि मुसोलिनी हे चढून जाणार ह्यांत शंका नाहीं. ॲबिसीनियांत आपल्या साम्राज्यास इंग्लंडनें मान्यता द्यावी ही मुसोलिनीची मागणी पुढें आलीच आहे. जर्मनीस त्याच्या वसाहती परत मिळण्याचे बाबतींत नरमाईचें धोरण इंग्लंडला स्वीकारावें लागणार असा रंग दिसत आहे. झेकोस्लोव्हेकिअन प्रकरणाचे आणखी दूरगामी परिणाम कोणते होणार हें आज सांगतां येत नाहीं. तथापि, त्याचे बाबतींत इंग्लंडनें कमकुवतपणा दाखवल्यामुळें जगांत आजचें युद्ध टळलें असलें तरी पुढें काय होईल ह्याची निश्चिती वाटत नाहीं. झेकोस्लोव्हेकियाच्या स्वार्थत्यागाचा परिणाम जगांत राजकीय आणि आर्थिक स्थैर्य निर्माण करण्यांत होईल अशी ब्रिटिश मुत्सद्यांस वाटत असलेली आशा फलद्रूपता पावेल तर तें इष्टच आहे. आज मात्र ह्या संबंधांत शंकेचें वातावरण पसरलें आहे.

### एका नवीन धंद्याची स्थापना

सर एम. विश्वेश्वर अय्या ह्यांनीं आपली मोटारींच्या कारखान्याची योजना प्रसिद्ध केली त्यास बरेच दिवस लोटले होते. दिल्ली येथें नुकत्याच भरलेल्या, उद्योगमंड्यांच्या परिषदेपुढें सर विश्वेश्वर अय्या ह्यांनीं आपली ही योजना विस्तृतपणें मांडली, तिला आतां विशेष महत्त्व प्राप्त झालें आहे. उद्योगधंद्यांच्या वाढीकरितां नेटानें प्रयत्न करण्याचा प्रांतिक सरकारांनीं निर्धार केला असून, त्याबाबत व्यावहारिक योजना तयार करण्याचें कामहि सुरू झालें आहे. मोटारींच्या कारखान्यासारख्या महत्त्वाच्या आणि मोठ्या उद्योगधंद्याच्या स्थापनेस त्यामुळें अनुकूल वातावरण निर्माण झालें आहे. मोटारींच्या कारखान्यास हिंदुस्थानांत वाव असून हा धंदा यशस्वी होण्यास जरूर त्या सर्व गोष्टी उपलब्ध आहेत, असा सर विश्वेश्वर अय्या ह्यांस विश्वास वाटत आहे. " अमेरिकेंतील प्रत्येक सात कामगारांपैकीं एका कामगाराचा चरितार्थ मोटारींचे धंद्यावर अवलंबून आहे आणि ह्या धंद्यांतील कामगारांस दरसाल मिळणाऱ्या वेतनाची रकम ३½ अब्ज रुपयांहून अधिक भरते " अशी माहिती सर विश्वेश्वर अय्या ह्यांनीं दिली आहे. त्यावरून ह्या धंद्याच्या व्यापाची कल्पना येईल. हिंदुस्थानांतील मोटार कारखाना हिंदी पोलाद आणि इतर कच्चा माल वापरील आणि हिंदी कामगारांसच नोकरीवर ठेवील. तज्ज्ञ इंजिनियरांस ह्या कारखान्यांत वाव मिळून औद्योगिक प्रगतीस अतिशय मोठी चालना मिळेल. नवीन यंत्रें तयार करून तीं यशस्वी रीतीनें चालविण्याचें लोकांस शिक्षण मिळेल. अशा अनेक मार्गांनीं हिंदी उद्योगधंद्यांची प्रगति घडून येऊन लोकांत नवचैतन्य निर्माण होईल आणि स्वतःच्या कर्तबगारीबद्दल लोकांत आत्मविश्वास जागृत होईल. म. जमशेटजी टाटा ह्यांनीं पोलादाचा कारखाना काढून तो यशस्वी करून दाखविला, तोंपर्यंत ह्या धंद्यासंबंधीं लोकांमध्यें अनास्थाच होती. परंतु, आज तो धंदा हिंदुस्थानाची दरसाल सहा कोटि रुपयांची बचत करीत आहे. मोटार गाड्यांचा कारखानाहि ह्याच रीतीनें यश मिळवील, अशी सर्वांची इच्छा असणें स्वाभाविक आहे. सर विश्वेश्वर अय्या सारखे कल्पक आणि अनुभवी योजक, प्रांतिक सरकारांचे संघटित प्रयत्न, हिंदुस्थान सरकारचें सहाय, धनिकांचें पाठबळ, इत्यादि एकत्र आलीं असतां ही गोष्ट विशेष अवघड नाहीं.

**न्याय-बोध ( कायद्याचें मराठी मासिक )**

" मालगुजार, कास्तकार, पाटील पटवारी, इजारदार, जहागिरदार, ऑ. मॅजिस्ट्रेट, ग्रामपंचायतींचे सरपंच व मेंबर, मुखत्यार, गुमास्ता, अर्जिनवीस, कारकून, मुकद्दम व कोर्टाशीं ज्यांचा संबंध येतो अशा लोकांकरितां हें मासिक प्रसिद्ध होत असतें." फर्म, कंपनी आणि सोसायटी यांचा प्रचलित कायदा काय आहे या संबंधीं श्री. के. बा. गजेंद्रगडकर यांची लेखमाला सध्या 'न्यायबोध' मध्यें चालू आहे. प्रीव्ही कौन्सिल आणि प्रांतिक हायकोर्टें ह्यांचे निवाडे, त्याचप्रमाणें वेळोवेळीं पास होणारे मध्यवर्ती आणि प्रांतिक कायदे ह्या मासिकांत प्रसिद्ध केले जातात. निवाडे छापतांना, प्रत्येक वेळीं वादाचा विषय, दाव्याची हकीकत, त्या संबंधांतील मुद्दे व विवेचन, कोर्टाचा निकाल आणि निवाड्याचा सारांश हीं सुव्यवस्थित आणि सुबोध देण्यांत येतात. श्री. न. ब. चांदुरकर आणि श्री. रा. वि. काळी हे वरील मासिकाचे संपादक आहेत. नागपूर येथील सेंट्रल हाऊसचे व्यवस्थापक श्री. के. के. पागे हे प्रकाशक आहेत. वार्षिक वर्गणी ५ रुपये.

---

**गेल्या आठवड्यांतील रोखे बाजार**

म्यूनिच परिषदेच्या निकालानंतर मुंबईच्या रोखे बाजारावर आशाजनक छटा पसरली आणि युरोपांतील परिस्थिति प्रत्यक्ष निवळल्यावर सरकारी रोखे आणि मंडळ्यांचे भाग ह्यांच्या किंमतींत सुधारणा घडून आली. ३½ टक्क्यांचे रोखे हे रोखे बाजाराची नाडी दाखवितात आणि त्यांचे किंमतींमधील चढउताराप्रमाणें इतर रोख्यांचे बाजारभाव हेलकावे खात असतात. मंगळवार ता. २७ सप्टेंबर रोजीं ह्या रोख्यांची किंमत ९१ रु. २आ. इतकी खाली गेली होती, ती सुधारून गेल्या शनिवारीं ९८ रुपये ११½ आण्यांपर्यंत गेली. इतर रोख्यांचे किंमतींतहि अशीच वाढ झाली आहे. भागांची खरेदी-विक्री थोडी मंदावलेली दिसते आणि सावधगिरीचें धोरण अवलंबण्याकडे लोकांची प्रवृत्ती असलेली आढळते. सोमवार ता.१० हा सेटलमेंटचा म्हणजे वायद्याचीं देणीं-घेणीं पुरीं करण्याचा दिवस होता, तो विशेष चलबिचल न होतां पार पडला.

---

**मुंबई शहरांत दारूबंदीचे प्रयत्न**

मुंबई शहरांतील गिरण्यांमधील कामगारांच्या पगारांचे दिवशीं मुंबईतील दारूचीं दुकानें बंद ठेवण्यांत येतात. ऑगस्ट १९३८ मध्यें हा उपक्रम सुरू झाला. ऑगस्ट १९३७ च्या मानानें ऑगस्ट १९३८ मध्यें २००० गॅलन देशी दारू कमी खपली, विलायती दारूचा खपहि ३,६०० बाटल्या कमी झाला आणि बीरच्या बाटल्या १२,००० कमी खपल्या. सप्टेंबर १९३८ मध्यें मात्र सप्टेंबर १९३७ चे मानानें दारूंच्या खपांत इतका मोठा उतार झालेला आढळला नाहीं, कारण दारूबंदीच्या दिवसाची तरतूद आगाऊ करण्याची युक्ति दारूबाज शिकले, हें होय. गिरणी कामगारांस आदल्या दिवशीं दारूखरेदी करून ठेवतां येणें शक्य नसल्यानें ते दारूबंदीच्या दिवशीं दुकानांत दारू मिळाली नाहीं तरी इतरांकडून दारू विकत घेतात, असें आढळून आलें आहे.

---

**मुंबई ते काठेवाड विमानांची वहातुक**

एअर सर्व्हिसेस ऑफ इंडिया लि. च्या विमानांची मुंबई ते काठेवाड ही वहातुक ता. १ ऑक्टोबर पासून पुनः सुरू झाली.

---


**दि गुड-वुइल ॲशुअरन्स कंपनी लि.**

पोस्ट : मिरज मिशन हॉस्पिटल

विमेदारांस

भरपूर सवलती माफक हप्ते

ठिकठिकाणीं एजंटस नेमणें आहेत.

पत्रव्यवहार करावा.

हेड ऑफिस : कुपवाड, जि. सातारा,

मॅनेजिंग डायरेक्टर

**CONFIDENCE**

is a worth-while asset in business building. The success that has attained Hindusthan's efforts to serve the public has its origin in public confidence, its

**YEARS OF**

Efficient Management, Fair Dealings, Prompt Settlement of Claims, Liberal Terms, Enterprize, Judicious Reserves, Sound Investments, Huge Assets and Useful Service

HAS CREATED

**PUBLIC CONFIDENCE**

The following figures will convince you :

**NEW BUSINESS**

Last year 1936-37

Exceeds

2 CRORES & 82 LAKHS

**BONUS**

PER THOUSAND PER YEAR

On Endowment Rs. 23 | On Whole Life Rs. 20

**HINDUSTHAN**

**Co-operative Insurance Society, Ltd.**

( ESTD. 1907 )

*Branches :* Bombay, Madras, Delhi, Patna, Lahore, Lucknow, Dacca.

*Office :* throughout India & the East.

S. C. MAJUMDAR,

MANAGER : Bombay Branch.

POONA OFFICE — 180, Budhwar Peth.

### सोलापुर डिस्ट्रिक्ट सेंट्रल को. बँक लि.

वरील बँकेचें भाग भांडवल १ लक्ष, २५३/४ हजार रुपये असून बँकेकडे एकूण १४ लक्ष रुपयांच्या ठेवी आहेत. रिझर्व्ह फंड ४२१/२ हजारांचा आहे आणि बिल्डिंग, व्याज, रिझर्व्ह, बॅड डेट, इत्यादि फंडांत मिळून ४६१/२ हजार रुपये आहेत. बँकेनें २३/४ लक्ष रुपये प्रांतिक सहकारी बँकेकडे मुदतबंद ठेवींत ठेवले आहेत. बँकेजवळील कर्जरोख्यांची ताळेबंदांत दाखविलेली किंमत ६५,९०९ रुपये असली तरी बाजारभावानें त्यांची किंमत ७०,२६५ रुपये भरते. बँकेनें व्यक्तिशः सभासदांस आणि सोसायट्यांस अनुक्रमें ४ लक्ष, ६५ हजार रुपये आणि ४ लक्ष, २१ हजार रुपये दिले आहेत. चालू वर्षी पीक चांगलें येऊन पेठांची स्थिति सुधारण्यास त्याचा उपयोग होईल, अशी आशा बँकेच्या अहवालांत व्यक्त करण्यांत आली आहे. ता. २५-११-१९३७ रोजीं बँकेनें करमाळा येथें आपली शाखा उघडली. जिल्ह्यामध्यें योग्य ठिकाणीं शाखा उघडण्याचें धोरण बोर्डानें ठेवलें आहे. बँकेच्या अहवालांत प्रत्येक शाखेचे हिशेब स्वतंत्रपणें दिले आहेत. वर्षअखेर बँकेस २०,९९८ रुपये नफा झाला, त्यांतून भागीदारांस ६% दरानें डिव्हिडंड देण्यासाठीं ७,५५० रु.चा विनियोग करण्याचें ठरलें. बँकेची वार्षिक सभा ता. २ रोजीं भरली होती.

### दि बँक ऑफ बार्शी लि.

(वार्षिक सभा:–१६-१०-३८)

वरील बँकेचे ७०,४२५ रुपयांचे भाग खपलेले असून वसूल झालेलें भांडवल १३,४८० रुपये आहे. ठेवींची रक्कम १,१८,००० रु. झाली आहे. रिझर्व्ह फंडांत २ हजार रुपये आहेत. बँकेनें १,१७,४५७ रुपये कर्जाऊ दिले आहेत. अहवालाचे वर्षी बँकेस निव्वळ नफा २,४६६ रुपये झाला, त्यांतून भागीदारांस ५% दरानें डिव्हिडंड देण्याकडे ७०० रुपयांचा विनियोग करावा अशी बोर्डाची शिफारस आहे. बँकेकडील ठेवींत आणि बँकेच्या व्यवहारांत विशेषपणानें वाढ होत आहे. श्री. एच. बी. उटगीकर, वकील हे बोर्ड ऑफ डायरेक्टर्सचे चेअरमन असून मेसर्स जी. डी. देशपांडे आणि कंपनी मॅनेजिंग एजन्ट्सचें काम करीत आहेत.

### बॅलट पद्धतीनें मतमोजणी करा

सहकारी सोसायट्यांच्या वार्षिक सभेचे वेळीं मतमोजणी बॅलट पद्धतीनें होण्यासंबंधीं सरकारनें हुकूम काढलेला आहे, त्याची अंमलबजावणी तात्काळ करण्यांत यावयाची आहे.

निवडणुकीविषयीं कानून दुरुस्त्या करून त्यांस रजिस्ट्रारची मंजुरी मिळेपर्यंत थांबण्याचें कारण नाहीं. हे हुकूम अंमलांत आणण्यासंबंधीं मुंबई विभागाचे असिस्टंट रजिस्ट्रार, ह्यांनीं सोसायट्यांस सक्त ताकीद दिली आहे.


## जाहीर नोटीस.

धी पंढरपूर अर्बन को० बँक लि. ची सव्वीसावी वार्षिक जनरल सभा तारीख २६।१०।३८ इ० रोजीं बुधवारीं सकाळीं ७ वाजतां अर्बन बँकचे हॉलमध्यें भरणार आहे. सभेपुढें येणारे विषयांची यादी ऑफिस बोर्डावर प्रसिद्ध करण्यांत आलेली आहे. सदर सभेकरितां बँकचे भागीदार लोकांनीं सदर तारखेस हजर येण्याची विनंति आहे, कळावें. ता. ८।१०।३८

कृष्णाजी रामचंद्र बडवे.
चेअरमन,
अर्बन बँक, पंढरपूर.


### मुंबई प्रांतांतील रस्ते

मुंबई प्रांतांतील उत्तर, मध्य आणि दक्षिण भाग ह्यांमधील लोकसंख्या, उत्पन्न, रस्ते, इत्यादींसंबंधीं तुलनात्मक माहिती खालील कोष्टकांत देण्यांत आली आहे—

| भाग | लोकसंख्या लक्ष हजार | क्षेत्रफळ ह. चौ. मै. | उत्पन्न १९३५-३६ कोटि रु. लक्ष | रस्त्यांची लांबी (मैल) |
|---|---|---|---|---|
| उत्तर भाग | ४०, ६२ | १४ | १, २८ | २,२९४ |
| मध्य भाग | ७२, ७३ | ३८ | १, ५७ | १२,९३५ |
| दक्षिण भाग | ५३, ९४ | २५ | १, ०७ | ४,२२७ |

### झेकोस्लोव्हाकियाचें नुकसान

झेकोस्लोव्हाकियाचे कांहीं प्रदेश आतां त्याचे ताब्यांतून गेले असल्यामुळें त्या देशाचें अतिशय नुकसान झालें आहे. उद्योगधंद्यांत गुंतलेल्या एकूण झेकांपैकीं ७१/२ लक्ष, म्हणजे शेंकडा ३३ इतके लोक जर्मनी अगर पोलंड ह्यांचे सत्तेखालीं जातील ह्यांपैकीं, कापडाच्या धंद्यांतीलच सुमारें २ लक्ष लोक आहेत. झेक मालाच्या निर्गतींत यामुळें निदान ३३ टक्क्यांची घट होईल असा, अदमास आहे.

### इंडस्ट्रिअल प्लॅनिंग कमिशनचे सभासद

काँग्रेस प्रांतांतील उद्योगमंत्र्यांच्या परिषदेनें योजिलेल्या इंडस्ट्रिअल प्लॅनिंग कमिशनवर नेमण्यासाठीं मुंबई सरकारनें शेठ कस्तुरभाई लालभाई, सर पुरुषोत्तमदास ठाकुरदास, प्रो. के. टी. शहा आणि डॉ. घेवर ह्यांचीं नांवें सुचविलीं आहेत, असें समजतें. कमिशनच्या सभासदांचीं नांवें मुकर होऊन जाहीर होण्यास एक महिन्याचा अवधि लागेल.

### मुस्लिम बँक ऑफ इंडिया

दि मुस्लिम बँक ऑफ इंडिया मुंडाळण्यांत यावी असा पंजाब हायकोर्टानें हुकूम दिला आहे.

### वऱ्हाडांतील सहकारी चळवळीसंबंधीं चौकशी

वऱ्हाडामधील सहकारी चळवळीसंबंधीं चौकशी करण्याकरितां श्री. गोळे, एम. एल. ए. ह्यांच्या अध्यक्षतेखालीं मध्यप्रांत सरकारनें एक कमिटी नेमली आहे.


## फर्म, कंपनी आणि सोसायटी

यांचा प्रचलित कायदा काय आहे याबद्दल सध्यां प्रसिद्ध कायदेपटु वकील श्री. के. द्वा. गजेंद्रगडकर यांनीं लिहिलेली लेखमाला "न्यायबोध" या कायद्याच्या मासिकांतून क्रमशः सुरू आहे त्याचप्रमाणें मुंबई हायकोर्टाचे निवाडे व वेळोवेळीं होणारे प्रांतिक कायदे प्रत्येक अंकांत प्रसिद्ध होतात. फर्म, कंपनी आणि सोसायटी यासंबंधीं लेख असलेली श्री. गजेंद्रगडकर यांची लेखमाला मुंबई इलाख्यांतील कायद्यास अनुसरून असल्यामुळें हें मासिक अवश्य संग्रहीं ठेवा. वा. व. टपा. सह रुपये ५; नमुना अंकासाठीं चार आण्यांचीं तिकिटें पाठवा.

मॅनेजर,
"न्यायबोध" मासिक, नागपूर शहर.

## उद्योगमंत्र्यांची परिषद्

राष्ट्रीय सभेचीं प्रधानमंडळें ज्यांत आहेत अशा सात हिंदी प्रांतांतील उद्योगमंत्र्यांची परिषद् दिल्ली येथें भरली होती. परिषदेनें मंजूर केलेल्या सात ठरावांचा गोषवारा खाली देण्यांत आला आहेः—

हिंदुस्थानांतील बेकारीचा, दारिद्र्याचा, राष्ट्रीय संरक्षणाचा आणि आर्थिक प्रगतीचा प्रश्न ह्या देशांत उद्योगधंद्यांची वाढ झाल्याविना सुटणार नाहीं. अशा औद्योगीकरणास प्रारंभ म्हणून एक व्यापक योजना आखण्यांत यावी. सर्व तऱ्हेच्या नवीन उद्योगधंद्यांची स्थापना आणि चालू धंद्यांचा विकास, ह्यांची त्या योजनेमध्यें तरतूद असावी. सबंध हिंदुस्थानाकरितां योजना तयार होईपर्यंत खालील उद्योगधंद्यांच्या स्थापनेबाबत प्रयत्न करण्यास प्रारंभ करावा.

( अ ) सर्व तऱ्हेची यंत्रसामुग्री.
( ब ) मोटारगाड्या आणि त्यांचे सुटे भाग.
( क ) विजेच्या धंद्याचें साहित्य.
( ड ) रसायनें आणि कृत्रिम खतें.
( इ ) धातू.
( फ ) विद्युत्पादनास लागणाऱ्या गोष्टी.

वरील उपक्रम हातीं घेण्याकरितां एक योजना-समिति नेमण्यांत यावी. ( ह्या समितीच्या सभासदांचीं नांवें काँग्रेसचे अध्यक्ष जाहीर करतील. ) समितीच्या कार्यास प्रांतिक सरकारांनीं आवश्यक ती वर्गणी देऊन आर्थिक सहाय करावें. समितीच्या कार्यास प्रारंभ झाल्यानंतर चार महिन्यांचे अवधींत तिनें आपला रिपोर्ट सादर करावा.

योजना-समितीच्या सूचनांचा विचार करून प्रत्यक्ष कार्य आंखण्याकरितां अखिल भारतीय स्वरूपाचें एक "प्लॅनिंग कमिशन" नेमण्यांत यावें. प्रत्येक प्रांताचा आणि संस्थानाचा एक प्रतिनिधि, फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्सचे चार प्रतिनिधी, अ. भा. ग्रामोद्योग संघाचा एक प्रतिनिधि आणि योजना समितीचे सर्व सभासद हे प्लॅनिंग कमिशनचे सभासद म्हणून काम करतील. कमिशनच्या पहिल्या सभेचें अध्यक्षपद काँग्रेसचे अध्यक्ष हे स्वीकारतील आणि त्या सभेंत कमिशनच्या चेअरमनची निवड होईल. कमिशननें खालील बाबींसंबंधीं तपशीलवार योजना आखावयाच्या आहेतः—

( अ ) विशिष्ट उद्योगधंद्यांची स्थापना कोठें व्हावी;
( ब ) उद्योगधंद्यांची घटना कोणत्या स्वरूपाची असावी; त्यावर सरकारी नियंत्रण असावें किंवा नाहीं, इ.;
( क ) उद्योगधंद्यांस भांडवलाचा पुरवठा कसा करावयाचा आणि उद्योगधंद्यांच्या व्यवस्थेची तरतूद कशी करावयाची, इ.

उद्योगधंद्यांच्या वाढीकरितां एकत्र येणाऱ्या प्रत्येक प्रांतानें आणि संस्थानानें कमिशनच्या प्राथमिक खर्चाची तरतूद करावयाची आहे. कमिशनच्या स्थापनेची पूर्वतयारी करण्याचें काम मद्रास प्रांताचे उद्योगमंत्री, श्री. गिरी, ह्यांचेकडे सोपविण्यांत आलें आहे.

सध्या वाया जात असलेल्या मोलॅसेस पासून पेट्रोल तयार करण्याची योजना हातीं घेणें अत्यावश्यक आहे. संयुक्त प्रांत, बिहार, मुंबई आणि मद्रास ह्या प्रांतांत वरील प्रश्नाविषयीं विचार चालू आहे, ही फार समाधानाची गोष्ट आहे. सर्व प्रांतांनीं आणि संस्थानांनीं ह्या बाबत सहकार्य करावें आणि वरील प्रकारचें कृत्रिम पेट्रोल ज्यांत मिसळलेलें नाहीं असें पेट्रोल मोटारी चालविण्यासाठीं विकणें बेकायदा ठरवावें. सर्व प्रांतांनीं आणि संस्थानांनीं मालाचा उठाव; औद्योगिक संशोधन; उद्योगधंदे आणि व्यापार ह्यासंबंधीं माहिती गोळा करणें; तज्ज्ञांची सल्लामसलत; शास्त्रीय आणि व्यापारी शिक्षण; इत्यादिबाबत एकमेकांस सहाय करावें. परिषदेपुढें मांडण्यांत आलेली मोटारींच्या उत्पादनाची योजना तिला पसंत आहे. योजना समितीनें तिचा विचार करून नॅशनल प्लॅनिंग कमिशनकडे आपल्या सूचना पाठवाव्या.

### जननाचें उतरतें प्रमाण

"ग्रेट ब्रिटनमध्यें १८९० सालीं जननाचें प्रमाण दर हजार लोकसंख्येस ३५·४ इतकें होतें, तें आतां दर हजारी १५ इतकें खालीं आलें आहे. युरोपांतील सर्व प्रजासत्ताक राष्ट्रांत हीच प्रवृत्ति आढळते. जर्मनीनें मात्र जननाचें प्रमाण वाढवून १९ केलें आहे आणि इटलीनें २२ वर नेलें आहे. सुख मिळविण्यासाठीं आपण शक्य ते प्रयत्न करतों आणि आयुष्यहि वाढवितों, परंतु जननाची संख्या वाढविण्याकडे मात्र दुर्लक्ष करतों. जगांत सर्व ठिकाणीं ब्रिटिशांची संख्या उतरंडीवर आहे. ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंड येथें जननाचें प्रमाण १७ पेक्षाहि अल्प आहे, ह्याचें कारण तेथील दाट वस्ती, हें खास नव्हे."—एडिंबरो येथील सॅनिटरी इन्स्पेक्टर्स असोसिएशनच्या परिषदेचे अध्यक्ष, सर लिओनार्ड हिल, ह्यांचें भाषण.

सेन्ट्रल प्रॉव्हिन्सेस् ॲण्ड बेरार
प्रॉव्हिन्शिअल् कोऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड.
नागपूर सिटी.
पैसे गुंतविण्यास उत्तम संधि.
गहाणी कर्जरोख्यांची तिसरी आवृत्ति
व्याजाचा दर ३½ दरसाल दर शेंकडा ] रु. ४,००,०००. [ मुदत २५ वर्षें.
दर्शनी किंमतीस विक्री
हे कर्जरोखे सरकारी रोख्यांप्रमाणें सुरक्षित. मुद्दल व व्याजाच्या फेडीसाठीं सरकारी हमी. सहामाही व्याज.
अर्ज ४ ते १५ ऑक्टोबर १९३८ पर्यंत घेतले जातील. सविस्तर माहितीसाठीं प्रसिद्धीपत्रक ( प्रॉस्पेक्टस ) मागवा.
जी. ए. भोंसुले—मॅनेजर

## निवडक बाजारभाव

बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) ३%

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५-५५ ) ... ... | ११७—४ |
| ५% ( १९३९-४४ ) लोन ... ... ... | १०३—२ |
| ४% १९४३ ... ... ... ... | १०८—८ |
| ३½% बिनमुदत ... ... ... ... | ९८-१४ |
| ३½% १९४७-५० ... ... ... | १०५-१२ |
| २¾% १९४८-५२ ... ... ... | ९९-१२ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लांब मुदत ) ... | १०९—८ |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... ... | १०८—८ |
| ४% मुंबई सिटी इंप्रूव्हमेंट ट्रस्ट बाँड ( ७० वर्षें मुदत ) | १०८—८ |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३-६३) ... .. | १११—८ |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) ... ... | १२४—० |

### मंडळ्यांचे भाग

( कंसांतील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया (१००—५०) ११% ... ... | १४२—८ |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% ... ... | १०८—८ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ८% ... | ३०—० |
| इंपीरिअल बँक ( ५०० ) १२% ... ... | १५६०—० |
| बाँबे प्रॉ. को. बँक ( ५० ) ५% ... ... | ६०—० |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% ... ... | ११५—० |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड-बारामती ( १०० ) ४½% ... ... | १००—० |
| पाचोरा-जामनेर ( १०० ) ४½% ... ... | ९५—८ |
| अहमदाबाद प्रांतज (५००) १२½% | ९२५—० |
| तापी व्हॅली ( ५०० ) ७½% ... ... ... | ७१८-१२ |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) ११% ... ... | ११८—० |
| कराची ( १०० ) ९% ... ... ... | १७५—० |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% ... ... | १६४-१२ |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% ... ... | १३०७—८ |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% ... ... | १४०५—० |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) ७ रु. ... ... ... | १८७—० |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००-५० ) २ रु. ... ... | ४२—० |
| शिंद्या स्टीम ( १५ ) १ रु. ... ... ... | १९—८ |
| न्यू इंडिया विमा ( ७५-१५ ) १ रु. ... | ३९—४ |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. ... | ४२५०—० |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ६% ... ... | २०२—८ |
| टाटा आयर्न दु. प्रे. ( २०० ) १५ रु. २ आ. ... | १५०—८ |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १० रु. ... ... | २७३—० |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) ३६ रु. ३ आ. ६ पै ... | १३०२-८ |
| असोसिएटेड सिमेंट ( १०० ) ७ रु. ८ आ. ... | ११५—० |

#### सोनें-चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळ्यास ... ... | ३६-६-४ |
| चांदी ( मिंट ) प्रत्येक १०० तोळ्यास ... ... | ५१-२-० |

## कायदे मंडळांत आर्थिक प्रश्नांवर प्रकाश

वर्तमानपत्रांतील क्रॉसवर्ड कोड्यांवर नियंत्रण घालण्याबाबत मुंबई सरकारचा विचार चालू आहे.

* * *

हिंदुस्थानांतील रेडिओ लायसनदारांची संख्या ३१ जुलै, १९३८ रोजीं ५६,५७१ इतकी भरली. प्रत्येक महिन्यास सरासरीनें सुमारें ८५० लोक नव्यानेंच परवाने काढीत आहेत.

* * *

मुंबई, अहमदाबाद, कराची, मद्रास आणि कलकत्ता येथील टेलिफोनची व्यवस्था लायसेन्स दिलेल्या कंपन्यांकडे आहे. इतर सुमारें २८५ ठिकाणीं सरकारी खात्यामार्फत टेलिफोनची व्यवस्था पहाण्यांत येते.

* * *

मोटार वहातुक नियंत्रण बिलानें मोटारींवर विम्याची सक्ती करण्याचें योजिलें आहे. ह्या विम्याच्या हप्त्यांचें वार्षिक उत्पन्न सुमारें दोन कोटि रुपये येईल व त्यापैकी शेकडा चाळीस रुपये क्लेमच्या रूपानें मोटारवाल्यांस द्यावे लागतील. ह्या विम्याचें काम सरकारनें स्वतः कडे राखून ठेवावें, म्हणजे प्रांतिक सरकारांस थोडीफार प्राप्ती होईल, असें श्री. न. वि. गाडगीळ ह्यांनीं मध्यवर्ती असेंब्लीमध्यें सुचविलें होतें.

* * *

विमाविषयक नवीन कायद्याच्या अंमलबजावणीस पूर्वी ठरल्याप्रमाणें १ ऑक्टोबर रोजीं प्रारंभ होणें कठीण आहे. कायद्यास अनुसरून कानू तयार करण्याचें काम चालू आहे.

* * *

हिंदी हुंडणावळीचा दर उतरविण्याच्या आवश्यकतेसंबंधीं हिंदुस्थान सरकार व मुंबई सरकार ह्यांमध्यें पत्रव्यवहार चालू आहे.

### झेकोस्लोव्हेकिया

गेल्या महायुद्धाचे समाप्तीनंतर, युरोपांतील लोकांच्या नैसर्गिक उत्क्रांतीस वाव मिळून त्यांची इच्छा असल्यास त्यांस स्वातंत्र्य मिळावें, ह्या हेतूनें स्वयंनिर्णयाचें तत्त्व अंमलांत आणण्यांत आलें. त्यास अनुसरून पोलंड, हंगेरी, झेकोस्लोव्हेकिया, युगोस्लाव्हिया, इत्यादि स्वतंत्र राष्ट्रें निर्माण करण्यांत आलीं. झेकोस्लोव्हेकियामध्यें जर्मन आक्रमणापूर्वी झेक आणि स्लाव्ह लोकांची मिळून शेकडा सत्तर इतकी लोकसंख्या होती आणि एक पंचमांश ते एकचतुर्थांश लोक जर्मन वंशाचे होते. झेकोस्लोव्हेकियाच्या सीमा नैसर्गिक स्वरूपाच्या नसल्यामुळें, त्या राष्ट्रावर चाल करून जाणें शेजारच्या देशांस अतिशय सोपें आहे. ऑस्ट्रिया-हंगेरींतून बोहिमिया विभक्त करून त्याचा समावेश झेकोस्लोव्हेकियांत केल्यामुळें, बहुमोल खनिज संपत्ती ह्या नव्या राष्ट्रास मिळाली. कोळसा, सोनें, चांदी, लोखंड, शिसें इत्यादि तेथें सापडतात. बोहिमिया उद्योगधंद्यांत अत्यंत पुढारलेला आहे आणि त्याबरोबरच तेथील शेतकरी वर्गहि अत्यंत कार्यक्षम आहे. झेकोस्लोव्हेकियाच्या वायव्येकडील मुलुखांत जर्मनांचा भरणा होता आणि बाकीच्या सीमांवरील प्रदेशांतहि झेकखेरीज इतर वंशांच्या लोकांचेंच संख्याधिक्य आहे. त्यामुळें, झेकोस्लोव्हेकियामध्यें ते सर्व समरस होऊं शकले नाहींत. त्यांतून फुटून बाहेर पडण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. जर्मनीनें ह्याबाबत पुढाकार घेऊन झेकोस्लोव्हेकियाचा लचका तोडला आहेच. त्याच्या उरलेल्या भागाचें स्वतंत्र अस्तित्व कसें आणि कोणत्या स्वरूपांत टिकतें, तें पहावें.

### कळवण तालुका सहकारी वृत्त

शेतकी मालाची परिस्थिति व शेतीच्या मालाचे उतरलेले भाव यांची परिस्थिती लक्षांत घेऊन मे. असिस्टंट रजिस्ट्रार साहेब को. सोसायटीज, मुंबई भाग यांनीं व्यक्तिशः व्याजाचे सवलतीची योजना चालू ठेवली होती. तिचा प्रचार येथील बँक इन्स्पेक्टर व यूनियन सुपरवायझर यांनीं सोसायट्यांचे लहान लहान गट करून व्याख्यानांचे रूपानें व या सवलतीकरितां मुद्दाम रचण्यांत आलेल्या पोवाड्यांचे सहायानें मोठ्या प्रमाणावर केला. त्याचा सोसायट्यांच्या वसुलीवर चांगला परिणाम होऊन चालू हंगामीं तारीख ३०-६-३८ अखेर रु. ४४,०१७ मुद्दल व रुपये १४,२७५ व्याजाचा वसूल झाला असून हें प्रमाण अंदाजलेल्या मुद्दल वसुलाशीं शेकडा ६७½ पडतें. व्याजांत सूट रूपानें २८९ सभासदांनीं २१३० रुपये मिळविले आहेत. पोवाडा रचण्याचें व तो म्हणून दाखविण्याचें कार्य याच भागांतील ग्रुप सेक्रेटरी मि. आनंदा झुगस पाटील यांनीं केलें होतें.

कळवण तालुका ग्रुप सेक्रेटरींची मासिक सभा ता. ५-७-३८ ला होऊन तींत या पुढील कामाचे धोरणाबाबत विचार झाला व पेरणी हंगामांत शुद्ध बीं वापरण्याचा प्रचार करण्याचें ठरलें. अकोला बाजरी पेरण्याबाबत उत्तेजन देण्यांत येऊन शेतकी खात्याकडून आणून दिलेल्या चाळण्यांद्वारें सोसायटींतील सभासदांनीं बीं चाळून पेरण्याबद्दलचा प्रचार करण्यांत येत आहे.

'तालुका इम्प्लिमेंट सोसायटी' च्या मॅनेजिंग कमिटीची सभा होऊन ३० लोखंडी नांगर शेतकी खात्याच्या सल्ल्यानें घेण्याचें ठरलें. हे नांगर लवकरच तालुक्यांतील सोसायट्यांचे सभासदांस पुरविण्यांत येणार आहेत.

---

**श्रीबलभीम परस्पर सहायकारी मंडळी अन्‌लि. कोल्हापूर**

वरील सोसायटीच्या पटावर ५७६ सभासद असून तिचें खेळतें भांडवल १ लक्ष, ८९ हजार रुपये आहे. एकूण ठेवी १ लक्ष, २८ हजारांच्या आहेत. रिझर्व्ह फंड ५३½ हजार रुपये झालेला आहे. सभासदांकडे एकूण १ लक्ष, ५३½ हजार रुपये कर्ज येणें आहे. ४१ सभासदांकडून १८,९३० रुपये थकबाकी येणें निघतें. "यंदा थकबाकीचें प्रमाण वाढतें दिसत आहे. त्यास आळा घालणेचा प्रयत्न मॅनेजिंग कमिटीकडून एकसारखा होत आहे" असा सोसायटीच्या अहवालांत शेरा आहे. १९३७-३८ साल अखेर सोसायटीस ५,६४४ रुपये नफा झाला, त्यापैकीं ४,५१४ रुपये रिझर्व्ह फंडाकडे आणि १,१२८ रुपये धर्मादाय फंडाकडे वर्ग करावे असें ठरलें. गेलीं २३ वर्षे बलभीम परस्पर सहायकारी सोसायटी चांगल्या तऱ्हेनें कार्य करीत आहे, हें अहवालावरून समजून येतें.

---

**करवीर सरकारचे नोकरांची सहकारी बँक, लि. कोल्हापूर**

वरील बँकेचे एकूण १,४०८ सभासद असून ४,४२९ भागांचें २२,१४५ रुपये भांडवल जमा आहे. बँकेकडे एकूण ९०½ हजारांच्या ठेवी आहेत. रिझर्व्ह फंड ५,१२८ रुपयांचा आहे. बँकेनें ५ हजारांचें सरकारी कर्ज घेतलेलें आहे. सभासदांकडे बँकेचें १ लक्ष, ११½ हजार रुपये येणें आहे आणि थकबाकी २,५६७ रुपये आहे. कर्जाच्या हप्त्यांची नियमित व मुदतींत फेड करणाऱ्या सभासदांस त्यांनीं भरलेल्या व्याजाच्या रकमेंत शेकडा १२½ टक्के सूट देण्यांत येते. अहवालाचे वर्षीं ५४७ सभासदांना ५०४ रुपयांची सूट मिळाली. वर्षअखेर बँकेस ५,०८५ रुपये नफा झाला, त्यापैकीं १,४२२ रुपयांचा विनियोग भागीदारांस ७½% दरानें डिव्हिडंड देण्याकडे करण्याचें ठरलें.


**६ टक्के मासिक आंवक ठेव**

डॉन ऑफ इंडियाच्या वरील योजनेप्रमाणें ठेव ठेवून फायदा मिळवा.

जनरल म्यानेजर-डॉन ऑफ इंडिया ला. इ. कं. लि. पुणें.

---

**स्वतःचे मुलांना योग्य तऱ्हेनें शिक्षण देऊन**

त्यांचे आयुष्यांतील पुढील मार्गांची योग्य रीतीनें कालक्रमणा करण्याची तरतूद करून ठेवणें हें प्रत्येक विचारवंत मातापितरांचें आद्य कर्तव्य होय. वरील प्रकारची सोय, उत्तम रीतीनें, फक्त "आयुर्विम्या"चे योगेंच साधतां येते.

**कॉमनवेल्थ विमा कंपनी लिमिटेड, पुणें.**

**ह्या सर्वश्रेष्ठ विमा संस्थेनें मुलांच्या शिक्षणाचे सोयीकरतां नवीन तऱ्हेचीं विद्यार्जनाचीं कोष्टकें सुरू केलीं आहेत.**

ह्या बाबतींतील विशेष माहितीकरतां खालील पत्त्यावर लिहा.

रा. न. अभ्यंकर
बी. ए., एलएल. बी.
मॅनेजिंग एजंट.

---

**दि प्रॉव्हिन्शिअल बँक ऑफ अिण्डिया लिमिटेड**

स्थापना १९३६

मुख्य कार्यालय: २२/अ, हॉस्पिटल रोड, (सी. ॲण्ड. अेम् स्टेशन) बंगलूर

शाखा: मुम्बअी, काळबादेवी, दादर, पुणें, पुणें-शहर, नाशिक, पांचगणी, सातारा, कऱ्हाड, सोलापूर, सुरत.

अध्यक्ष: खानसाहेब हाजी अहमद कासम, अेम. अेल. सी.
मॅ. डिरेक्टर: अेस्. पी. ठाकर.

**करण्ट डिपॉझिट अकाउण्टस्:** १०० रु. किंवा त्याहून अधिक रकमांनीं चालू होतात आणि दैनिक शिलकेवर दरसाल दरशेंकडा २ टक्के व्याज दिलें जातें.

**सेव्हिंग्ज डिपॉझिट अकाउण्टस्:** ५ रुपये आणि त्याहून अधिक रकमानिशीं चालू होतात आणि मासिक किमान शिलकेवर दरसाल दरशेंकडा ३ टक्के व्याज दिलें जातें. २०० रुपयापर्यंत कितीहि वेळा पैसे काढतां येतात. हा व्यवहार चेकनें करतां येतो.

**कायम मुदतीच्या ठेवी:** दीर्घकालीन आणि अल्पकालीन मुदतीच्या ठेवी सोयीस्कर अटीवर स्वीकारण्यांत येतात. ह्या-संबंधीची माहिती कार्यालयाकडून घ्यावी.

अनुमती मिळालेल्या कर्जरोख्यावर हातउसन्या रकमा मिळतात.

सर्व प्रकारचें बँकिंगचें कामकाज केलें जातें.

अधिक माहिती मागवावी.

एम्. मोहन, एजंट, १७ मेनस्ट्रीट, पुणें. एच. जी. गद्रे, एजंट, लक्ष्मीरोड, पुणें. २

पूर्वीची कर्जयोजना चालू असून शिवाय कर्जखातें नं. २ नें
द. म. द. शें. ४चार आणे व्याजानें
व
अनुक्रमानें रु. १०० ते २०००
देण्याची नवीन योजना. लवकर अर्ज करा; लवकर कर्ज मिळवा. त्वरा करा आणि प्रॉसपेक्टस व एजन्सीसाठीं ०२ आण्याचीं तिकिटें पाठवा अगर समक्ष भेटा.
दि हिंदुस्थान इंडस्ट्रियल कंपनी, लि.
हेड ऑफिसः-गिरगांव, मुंबई. ब्रँचः-लक्ष्मी रोड, पुणें नं. २.

FOR
SAFETY, ECONOMY
AND
DURABILITY
Consult
V. G. & Sons
ELECTRICAL and RADIO ENGINEERS
AND
LICENSED ELECTRICAL CONTRACTORS
Laxmi Road, Ganapati Chowk, POONA.

दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

अधिकृत भांडवल १०,००,००० विक्रीस काढलेलें भांडवल ५,००,०००
खपलेलें भांडवल २,४४,६०० वसूल झालेलें भांडवल १,२२,३००

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात. सेव्हिंग्ज खात्यावर चेक्स काढतां येतात. या बँकेवरील चेक मुंबईला सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि. मार्फत कमिशनशिवाय वसूल केले जातात. बँकेचे नियम, व्याजाचे दर व शेअर बद्दल बँकेकडे चौकशी करावी.

M. Y. GOKHALE,
काकाकुवा मॅन्शन, लक्ष्मीरोड, पुणें २. मॅनेजर.

—किती आनंददायक!—

[१] 'स्कोडा' कंपनीला मशिनरीची सर्व रक्कम आपल्या सिंडिकेटनें दिली.

[२] सिंडिकेटची मशिनरी किंवा ऊंस कोठेहि गहाण अगर तारण दिलेला नाहीं.

[३] १९३९ सालीं चार लक्ष रुपयांची साखर तयार होणार.

[४] १९४० सालीं बारा लक्ष रुपयांची साखर तयार होणार.

[५] महाराष्ट्राच्या औद्योगिक यशाला मदत
व
दरसाल साडेपांच टक्के व्याज व दोन वर्षांनीं डिपॉझिटची रक्कम परत.

सविस्तर माहिती व डिपॉझिट फॉर्म खालील पत्त्यावर मिळतील.
दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, २५७ बुधवार पेठ, पुणें २.

अप-टु-डेट शिलाई करतां

**महिंद्रकर ब्रदर्स यांचेकडे चौकशी करा**

बुधवार चौक, पुणें — १२ तासांत कपडे शिवून मिळतील. — [ खादी भांडाराचे माडीवर

**पराडकर टेलर्स ॲकॅडिमी**

( सिटी पोस्टासमोर पुणें २ )

येथें शिवणकलेचें शास्त्रीय व व्यावहारिक धंदेशिक्षण फीसुद्धां सर्व खर्च मिळून फक्त ११० रु. त पूर्ण खात्री होईपर्यंत मिळतें.

**सुप्रसिद्ध संचालक मंडळ** व नामांकित व्यवहारपटु डायरेक्टर असलेल्या एका सुप्रसिद्ध विमा कंपनकिरतां महाराष्ट्र, कर्नाटक आणि गोमांतक प्रांतांत विमा शास्त्राचा पूर्ण अनुभव असलेल्या गृहस्थांना भरपूर पगार व कमिशनवर नेमणें आहे.

**दि ग्रेट सोशल लाइफ ॲन्ड जनरल ॲशुअरन्स कं. लि.**

( हेड ऑफिस : जळगांव )

माहिती मागवा — चीफ ऑर्गनायझिंग ऑफिस, लक्ष्मी रोड, पुणें २




अखिल हिंदुस्थानांत पहिल्या प्रतीचें अत्यंत लोकप्रिय

**झारापकर टेलरिंग कॉलेज**

आप्पा बळवंत चौक, पुणें २

[ माहितीपत्रक मागवा ]

**'अभिनंदनीय प्रगति'** असेच बोल नाशिकच्या सह्याद्रि विमा कंपनीबद्दल सर्वांच्या तोंडून निघत आहेत. किमान हप्ते, चोख व्यवस्था, वजनदार संचालक, कर्तबगार प्रतिनिधि व आकर्षक योजना वगैरे अनेक सर्वोत्तम गोष्टी याच संस्थेंत आहेत. पॉलिसी किंवा एजन्सी घेण्यापूर्वी आमचा सल्ला घेण्यास चुकूं नका. ठिकठिकाणीं पगार व कमिशनवर प्रतिनिधि पाहिजेत.

लिहा अगर भेटा. | मॅनेजिंग डायरेक्टर

**'अर्थ' ग्रन्थमाला**

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

**सुप्रसिद्ध तुळजाराम मोदी यांचे पेढे व वर्फी वापरा**

मोती चौक : : : सातारा

**S. B. JOSHI & Co.**

ENGINEERS & CONTRACTORS

41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City.

**K. K. & Co.**

Photographic Dealers

POONA.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.